**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)**
मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर पिन.४२३१०९
फोन नं. (०२४२३) २५८५००/२५८७७१/२५८७७२ फॅक्स नं.२५८८७०
(Website www.sai.org.in , E-mail – purchase@sai.org.in)

## जाहीर ई-निविदा

श्री साईबाबा संस्थानचे प्रसादालय,लाडू निर्मिती, कॅन्टीन व मंदिर विभागांसाठी सन २०२०-२१ करीता (एप्रिल २०२० ते मार्च २०२१) किराणामाल व इतर अनुषंगिक साहित्य खरेदीकामी पुरवठाधारक/वितरक/उत्पादक यांचेकडून स्वतंत्रपणे १० प्रकारच्या ई-निविदा ऑनलाईन मागविण्यात येत आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ.नं | निविदेचा तपशील | निविदा फी | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | किराणामाल धान्य, कडधान्य, डाळी, ड्रायफ्रुट्, वनस्पती तूप व इतर वस्तु | रू.१८,०००/- | रू.१,८०,०००/- |
| २ | मसाले | रू.१६,५००/- | रू.१,६५,०००/- |
| ३ | चहा पावडर व कॉफी | रू.४,०००/- | रू.६६,०००/- |
| ४ | खादयतेल | रू.१८,०००/- | रू.१,८०,०००/- |
| ५ | बिस्कीटे | रू.१३,२००/- | रू.१,३२,०००/- |
| ६ | टोन्ड गाय दुध | रू.३०,०००/- | रू.३,००,०००/- |
| ७ | पत्रावळ | रू.३,८००/- | रू.५५,०००/- |
| ८ | पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर | रू.१८,०००/- | रू.१,८०,०००/- |
| ९ | पेपर पिशवी | रू.१८,०००/- | रू.१,८०,०००/- |
| १० | पेपर कप | रू.१२,०००/- | रू.१,२०,०००/- |

१. ई-निविदा व ई-निविदेबाबतच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२. निविदा ऑनलाईन डाऊन लोडींग व अपलोडींगसाठी दि. २८/०२/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि. १९/03/२०२० सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहतील.

३. निविदा फी व बयाणा रक्कम शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी

४. दि.१८/3/२०२० ते दि. १९/3/२०२० या कालावधीत सायं.०५.०० वाजेपर्यंत (रविवार खेरीज) निविदेमध्ये दर भरलेल्या किराणामाल व अनुषंगिक साहित्याचे नमुने शिर्डी येथील खरेदी विभागाचे कार्यालयात जमा करावेत.

५. शक्य झाल्यास तांत्रिक निविदा दि.२०/03/२०२० रोजी उघडण्यात येतील.

कोणतीही निविदा अंशतः/पुर्णपणे स्वीकारणे अथवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे.

(दीपक मुगळीकर, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी

# SHRI SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI

At/post-Shirdi, Tal-Rahata, Dist- Ahmednagar- 423109
Phone No.(02423) 258500/771/772, Fax No.02423-258870
(Website www.sai.org.in , E-mail – purchase@sai.org.in)

---

## E-TENDER NOTICE

E-tenders are invited from Supplier/Manufacturers/Dealers for the supply of Grocery & Other material for our Prasadalya, Ladu Nirmiti, Canteen & Temple Department for the year 2020-21 (April 2020 to March 2021), separately through 10 E-tenders detailed given below:-

| Sr.NO. | Tender Description | Tender Fee | E.M.D. |
|---|---|---|---|
| 01 | Cereals, Pulses, Dry Fruits, Vanaspati Ghee & Other Material | Rs.18,000/- | Rs.1,80,000/- |
| 02 | Spices | Rs.16,500/- | Rs.1,65,000/- |
| 03 | Tea Powder & Coffee | Rs.4,000/- | Rs.66,000/- |
| 04 | Edible Oil | Rs.18,000/- | Rs.1,80,000/- |
| 05 | Biscuits | Rs.13,200/- | Rs.1,32,000/- |
| 06 | Toned Cow Milk | Rs.30,000/- | Rs.3,00,000/- |
| 07 | Leaf Patrawal | Rs.3,800/- | Rs.55,000/- |
| 08 | Packaged Drinking Water | Rs.18,000/- | Rs.1,80,000/- |
| 09 | Laminated Paper Bags | Rs.18,000/- | Rs.1,80,000/- |
| 10 | Paper Cup | Rs.12,000/- | Rs.1,20,000/- |

1. E-Tenders & its terms and conditions are available on www.mahatenders.gov.in.
2. The E-Tenders are available for Downloading & Uploading from Dt.26/02/2020 11.00 AM to 17/03/2020 up to 5 PM.
3. Tender Fee & EMD should be paid Online on the website www.mahatenders.gov.in
4. The samples of Grocery & Other Material are to be submitted from 18/3/2020 10 AM to 19/3/2020 up to 5.00 PM at our Shirdi Purchase office on all working days except Sunday.
5. If possible Technical Bids will be opened on 20/3/2020.

Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi reserves the right to accept partly/fully any tender or reject all tenders without assigning any reason thereof.

(Deepak Muglikar, I.A.S.)
**CHIEF EXECUTIVE OFFICER**

18/2 18/2 18/2/2020

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**शिरडी ४२३ १०९.**

**तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगर**

---

दुरध्वनी क्रमांक (०२४२३) २५८५००, खरेदी विभाग- २५८७७१, २५८७७२,

फॅक्स क्रमांक ०२४२३-२५८८७०

Website – www.sai.org.in E-mail 1.saibaba@sai.org.in 2.purchase@sai.org.in

---

**मुंबई कार्यालय -** साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर

मुंबई-४०० ०१४ दूरध्वनी क्रमांक (०२२) २४१६६५५६, २४१६१२९३

---

## सन २०२०-२१

## (माहे एप्रिल-२०२० ते मार्च-२०२१ अखेर)

## श्री साईबाबा संस्थानचे कॅन्टीन विभागासाठी

## बिस्कीटे पुरविणेबाबत ई-निविदा

**A.** **निविदेचा तपशिल- श्री साईबाबा संस्थानचे कॅन्टीन विभागासाठी बिस्कीटे पुरविणेबाबत ई-निविदा**

**B.** **ई-निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे, आर्थिक उलाढालीचे निकष वगैरे तपशील खालीलप्रमाणे-**

१. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने अदयावत दुकान नोंदणी दाखला/स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला/ तत्सम शासकीय परवाना ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

२. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने GST नोंदणी दाखला अगर GST Online Registration Receipt ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

३. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने FSSAI परवाना ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील.

४. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने पॅन कार्ड ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

५. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या फर्मची सन २०१६-१७, २०१७-१८, २०१८-१९ या ३ आर्थिक वर्षाची सरासरी वार्षिक उलाढाल नमुद असणारे दिलेल्या नमुन्याप्रमाणे सी.ए यांचे प्रमाणपत्र ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

६. निविदाधारकाची वरील नमुद ३ आर्थिक वर्षाची किमान वार्षिक सरासरी उलाढाल रक्कम रू.२४,००,०००/- असणे अनिवार्य राहिल.

**C.** **निविदाधारकाने बिस्कीटांचे नमुने सादर करण्याची पध्दत-**

१. निविदाधारकाने निविदा भरलेल्या बिस्कीट पुडयांचे नमुने सादर केलेले बिस्कीट पुडयांचे यादीसह संस्थानच्या खरेदी विभागामध्ये विहित मुदतीत जमा करणे अनिवार्य राहिल. त्यावर निविदाधारकाने आपले फर्मचे नांव लिहिलेले असावे. दिलेले नमुने कोणत्याही सबबीवर परत केले जाणार नाहीत अगर बदलता येणार नाहीत.

२. बिस्कीटांचा एकाच कंपनीचा/ एकाच प्रकारचा नमुना सादर करावा. दोन किंवा अधिक नमुने सादर करू नये. तसे केल्यास एकाच नमुन्याचा विचार केला जाईल.

३. निविदाधारकाने बिस्कीटांचे नमुने देताना असे नमुने द्यावेत की पुरवठा आदेश मिळालेनंतर त्याच नमुन्याच्या बिस्कीटांचा संस्थानला पुरवठा होईल.

**D.** **पुरवठा करावयाच्या बिस्कीटांचा तपशिल, निविदा फी व बयाणा रक्कम-**

१. पुरवठा करावयाचा बिस्कीटांचा तपशिल BOQ मध्ये दिलेला आहे. त्यात ऑनलाईन दर नमूद करून निविदा ऑनलाईन भरावयाची आहे.

२. निविदा फी रक्कम रु.१३,२००/- व बयाणा रक्कम रु. १,३२,०००/- मात्र www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

३. **MSME अंतर्गत निविदा फी व बयाणा रक्कम न भरण्याची सवलत या निविदेला लागू नाही. सर्व निविदाधारकांनी निविदा फी व बयाणा रक्कम भरणे अनिवार्य आहे.**

**E.** **निविदाधारकांसाठी सुचना-**

१. सदर निविदा दि.२६/ २ /२०२० रोजी सकाळी ११.०० वाजेपासून दि.१०/ ३ /२०२० सायं. ०५.०० वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Downloading व Uploading साठी उपलब्ध राहील.

२. ई-निविदा भरलेल्या बिस्कीटांचे नमुने दि. १५ / ३ /२०२० ते दि.१९ / ३ /२०२० अखेर सायं. ५.०० वाजेपर्यंत (रविवार खेरीज) संस्थानचे शिर्डी येथील खरेदी विभागाचे कार्यालयात जमा करावेत.

३. ई-निविदेसोबत फक्त Online कागदपत्रे सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये कागदपत्रे सादर करु नयेत. Hard Copy मध्ये सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.

४. शक्य झाल्यास दि.२० / ३ /२०२० रोजी Online Technical Bid उघडण्यात येईल. तांत्रिक निविदेत पात्र ठरलेल्या निविदाधारकांचीच कमर्शिअल बीड उघडण्यात येतील.

५. Commercial Bid उघडणेचे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधींनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. ऑनलाईन निविदा सादर करताना निविदाधारकांनी आपले फोन नंबर्स ऑनलाईन निविदेमध्ये विहित तक्त्यामध्ये नमूद करावेत म्हणजे पात्र ठरणा-या निविदाधारकांना Commercial Bid उघडणेची तारीख व वेळ कळविता येईल.

६. नमुने नसलेली निविदा विचारात घेतली जाणार नाही.

## F. निविदेत ऑनलाईन दर भरतांना सर्व कर व खर्चासह दर नमूद करणे-

१. निविदेमध्ये ऑनलाईन दर भरतांना GST-TDS, TDS, आयकर अगर इतर कुठलाही शासकीय कर, पॅकिंग व फॉरवर्डिंग खर्च, जकात, वाराई वगैरे सर्व खर्चासह शिर्डी संस्थानचे भांडार विभागामध्ये पोहोच वाहतूक खर्च या सर्व बाबींचा विचार करूनच दर भरावेत.

२. शासन नियमानुसार वेळोवेळी लागू होणारे कर पुरवठाधारकावर बंधनकारक राहतील व त्याप्रमाणे रक्कम बीलातून कपात करण्यात येईल. शासनाने १ ऑक्टोबर २०१८ पासून करपात्र वस्तु/सेवा अथवा दोन्हीसाठी पुरवठादाराला करावयाचे प्रदानातुन २% GST-TDS वजा करणेबाबत परिपत्रक क्रं.२०१८०९२८१७१४३६६६०५ अन्वये निर्देशित केले आहे. त्याचाही निविदा भरतांना निविदाधारकाने विचार करावा. याबाबतची आधिक माहिती महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहे

## G. ऑनलाईन निविदा उघडण्याची व नमुने निवडण्याची कार्यपध्दती-

१. निविदेचा Download कालावधी संपल्यानंतर खरेदी समितीचे सभेत ऑनलाईन तांत्रिक ई-निविदा प्रथम उघडण्यात येतील. त्यानंतर तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांनी सादर केलेले नमुने तज्ञ समितीमार्फत निवडण्यात येतील.

२. नमुने निवडून अंतिम झालेनंतर कमर्शिअल बीड उघडण्यात येऊन नमुने निवड झालेल्या निविदाधारकांच्या त्या बिस्कीटांचे दरांचा तुलनात्मक दृष्टया विचार करण्यात येईल व यामध्ये न्युनतम दरधारकांशी चर्चा व वाटाघाटी करण्यात येतील व त्यानुसार अंतिम निर्णय घेतला जाईल.

## H. बिस्किटे पुरवठा करावयाचे ठिकाण-

१. निविदेत नमूद केलेल्या बिस्कीटांचा पुरवठा शिर्डी येथील संस्थानचे श्री साईमंदिराचे जवळील भांडार विभागामध्ये अगर बायपास रोडवरील संस्थानच्या गोडावूनमध्ये करावा लागेल. प्रसंगी कॅन्टीन विभागाकडे पुरवठा करावा लागेल.

## I. सुरक्षा अनामत रक्कम व करारनामा-

१. शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांच्या निविदा मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत बिस्कीटांचा पुरवठा करावयाची हमी म्हणून एकुण पुरवठा आदेश रक्कमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून संस्थानकडे ठेवावी लागेल. निविदा मंजूर झाल्याचे कळविलेनंतर सदर रकमेचा भरणा करावा लागेल. ही सुरक्षा अनामत रक्कम व्यवस्थितरित्या बिस्कीटांचा पुरवठा केलेनंतर परत केली जाईल. सुरक्षा अनामत अगर बयाणा रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

२. निविदा मंजूर झालेनंतर ३% सुरक्षा अनामत रक्कम त्वरित भरावी लागेल. तसेच शिर्डी येथे समक्ष येऊन रु.६००/- चे स्टॅम्प पेपरवर त्वरित करारनामा नोटरी करुन देणे बंधनकारक राहील. करारनाम्याची नोटरी फी निविदाधारकास आदा करावी लागेल.

**J. बिस्कीटांचा पुरवठा करण्याची मुदत -**

१. बिस्कीटे पुरवठा करण्याचा कालावधी १ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२१ असा राहिल.

२. बिस्कीटे पुरवठा मागणी चलनात दिलेले Schedule प्रमाणे अगर चलन दिलेपासून जास्तीत जास्त १० दिवसात बिस्कीटांचा पुरवठा करावा लागेल. प्रसंगी दूरध्वनीवर कळविलेसही पुरवठा करावा लागेल.

३. शिर्डी येथे दर्शनासाठी भेट देणा-या साईभक्तांच्या गर्दीवर हि सेवा अवलंबुन असलेमुळे प्रत्येक महिन्यात अगर कमी जास्त मुदतीत अगर संस्थानचे धोरणानुसार गरजेप्रमाणे बिस्कीटांची मागणी केली जाईल. एकदम सर्व बिस्कीटे घेतली जाणार नाही. संस्थानचे खरेदी चलनाप्रमाणे वेळोवेळी बिस्कीटे पुरवावे लागतील. तसेच मागणीपेक्षा जादा बिस्कीटे पुरविलेस ती स्विकारली जाणार नाहीत.

४. संस्थानची सदर मागणी ही अंदाजित असल्यामुळे पुरवठा कालावधीत अगर त्यानंतरही पुढील वर्षाची खरेदी संबंधीत प्रक्रिया पुर्ण होईपावेतो गरजेनुसार मंजुर केलेल्या परिमाणापेक्षा २५ टक्केपर्यंत जादा बिस्कीटांची मागणी संस्थानकडून झाल्यास त्या बिस्कीटांचा पुरवठा मान्य दरानेच करणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. तसेच पुरवठा आदेशामध्ये नमुद केलेली सर्व बिस्कीटे खरेदी करणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

**K. बिस्कीटे स्वीकार करण्याची पध्दत-**

१. पुरवठा आदेशातील वर्णनाप्रमाणे बिस्कीटांचा पुरवठा करावा व त्याप्रमाणेच बिस्कीटांचे बिल सादर करावे.

२. ज्या नमुन्याच्या बिस्कीटांची निविदा मंजूर होईल त्या दर्जाप्रमाणेच बिस्कीटांचा पुरवठा करावा लागेल. कमी दर्जाची वेगळ्या प्रकारची अगर जातीची किंवा खराब बिस्कीटे स्विकारली जाणार नाहीत. अशा बिस्कीटांचा पुरवठा झाल्यास ते स्वखर्चाने तात्काळ परत घेऊन जाणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. ते न नेल्यामुळे त्यांची नासधूस झाल्यास त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.

३. पुरवठाधारकाने पुरवठा आदेश दिलेनंतर निविदेसोबत दिलेल्या व मान्य झालेल्या ब्रॅण्ड/नमुन्याप्रमाणेच बिस्कीटे पुरवणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहिल.

४. पुरवठा आदेशाप्रमाणे संस्थानकडे बिस्कीटे पाठविल्यानंतर संस्थानने विहीत केलेले यंत्रणेकडून बिस्कीटांची तपासणी केली जाईल. त्यांना योग्य वाटल्यास ते स्विकारण्यात येईल.

५. बिस्कीटे पॅकिंगसाठी वापरण्यात येणारे मटेरीअल Food grade असावे.

६. पुरवठा करीत असलेल्या बिस्कीटांची Quantity जास्त असल्यामुळे, संस्थानकडून Randomly Sample घेऊन बिस्कीटे स्विकारली जातात. तथापी बिस्कीटे स्विकारलेनंतरही एखादा बॉक्स, लॉट अगर काही खराब बिस्कीटे आढळल्यास ती स्वखर्चाने बदलून द्यावी लागतील.

७. बिस्कीटे पुरवितांना FSSAI कायदयातील तरतुदीनुसार पाऊच/बॉक्सवर Date of Packing, Weight and Best Before Date चा स्पष्ट उल्लेख असावा.

८. बिस्कीटे पुरवितांना पाऊच/बॉक्सवर लेबल अन्न सुरक्षा नियम २०११ व वैध मापन शास्त्रच्या तरतुदीप्रमाणे असावे.

**L. लॅब तपासणीची कार्यपध्दती-**

१. पुरविलेल्या बिस्कीटांची गरजेनुसार संस्थान प्रयोगशाळा/जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा/NABL/केंद्र शासनाच्या/राज्यशासनाच्या मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतून तपासणी करणेत येईल.

२. संस्थानने करुन घेतलेले लॅब तपासणीमध्ये पुरविलेल्या बिस्कीटांचा रिपोर्ट FSSAI Standard प्रमाणे नसल्यास सदर बिस्कीटे बदलून द्यावी लागेल. त्यादरम्यान संस्थानला बाहेरुन बिस्कीटे विकत घ्यावी लागल्यास जादा आलेल्या खर्चाची रक्कम अधिक पुरविलेल्या बिस्कीटांच्या किंमतीच्या २ ते ५ टक्के दंड देय असलेल्या बील रकमेतून/सुरक्षा अनामत रकमेतून वसूल करण्यात येईल.

...३...

३. काही वेळेस लॅब रिपोर्ट येण्यासाठी विलंब होतो अशा वेळी जर पुरविलेली बिस्कीटे वापरली गेली व नंतर लॅब रिपोर्ट Standard प्रमाणे न आल्यास त्या लॉटमधील बिस्कीटांच्या किंमतीच्या २ ते ५ टक्केपर्यंत दंड आकारला जाईल.

४. एकाच प्रकारच्या बिस्कीटांचा लॅब रिपोर्ट सलग तीन वेळेस FSSAI Standards नुसार न आलेस सदर पुरवठाधारकावर संस्थानकडून उचित कारवाई करणेबाबत निर्णय घेतला जाईल. याबाबत पुरवठादाराची कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

५. संस्थान लॅबचा रिपोर्ट FSSAI Standards नुसार नसल्यास केंद्र शासनाच्या मुंबई येथील शासकीय/NABL लॅबमध्ये भांडार विभागाकडून तेच सॅम्पल तपासणी करुन त्याची पुर्न खात्री करण्यात येईल. सदर लॅबचा तपासणी अहवाल अंतिम समजन्यात येईल.

**M बील आदा करण्याची पध्दती-**

१. पुरविलेल्या बिस्कीटांचे बिल त्याचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावरच आदा करणेत येईल. सदर बिस्कीटांच्या पुरवठ्यापोटी आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

२. बिस्कीटांची तपासणी करुन ताब्यात घेतलेल्या बिस्कीटांचे बील संस्थानकडे सादर केलेपासून ३० दिवसांचे आत संबंधित पुरवठाधारकाला आदा करण्याचा प्रयत्न राहिल.

३. पुरवठाधारकोन पुरविलेली बिस्कीटे संस्थानने नाकारली व त्यामुळे पुढील कालावधीसाठी संस्थानला बाजारभावाने दुसरीकडून बिस्कीटे खरेदी करावे लागल्यास त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतुन अथवा संस्थानकडून देय असलेल्या इतर बिस्कीटांच्या बिलातुन वसुल केली जाईल.

४. शासन नियमानुसार आवश्यक असलेल्या कर कपाती बिलातून करण्यात येतील.

**N. आपत्ती/ नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईबाबतची तरतुद :-**

१. पुरवठा आदेशातील बिस्कीटे मुदतीत पुरविली नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

| | |
|---|---|
| अ) पुरवठा न केलेल्या बिस्कीटांची किंमत रु.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास | प्रती आठवडा ०.५० % दराने जास्तीत जास्त १० % पर्यंत |
| ब) पुरवठा न केलेल्या बिस्कीटांची किंमत रु.२.०० लाख किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास | प्रती आठवडा ०.५० % दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत |

२. बिस्कीटे पुरविणेचा आदेश दुरध्वनीवरुन अथवा मागणी चलनात दिलेले Schedule प्रमाणे अगर चलन दिलेपासून जास्तीत जास्त १० दिवसांचे आत बिस्कीटांचा पुरवठा न झाल्यास अगर योग्य प्रतीची नसल्यामुळे ती नाकारली गेल्यास संस्थानची अडचण होऊ नये म्हणून, संस्थानला बाजारभावाने आवश्यक तितकी किंवा दिलेल्या आदेशा इतकी बिस्कीटे दुसरीकडून खरेदी करण्याची मुभा राहील. अशा खरेदी केलेल्या बिस्कीटांसाठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई पुरवठाधारकाने संस्थानला करुन दयावयाची आहे. सदरची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अगर पुर्वीच्या/नंतरच्या आलेल्या बिस्कीटांच्या बिलातून वसुल करण्याचा अधिकार संस्थानला राहील.

३. निविदेतील मंजुर दराने व निवडलेल्या ब्रॅण्ड/ नमुन्याप्रमाणे बिस्कीटांचा पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजुर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने बिस्कीटांचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा बिस्कीटे पुरवठा न केल्यास संस्थानला बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन बिस्कीटे खरेदी करावी लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल. तसेच याबाबत संस्थानच्या मा.तदर्थ समिती/मा.व्यवस्थापन समिती/मा.उपसमिती/मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घेतलेले निर्णयाप्रमाणे उचित कारवाई करण्यात येईल. याबाबत पुरवठाधारकाची कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

४. निविदा पुरवठा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी पुरवठाधारकांच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अतिवृष्टी, दुष्काळ, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक बिस्कीटांचा पुरवठा करु शकला नाही व तसे पुरवठाधारकाने संस्थानला त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल. तथापि सदर तरतूद ही फक्त पुरवठा करण्यात झालेला विलंब क्षमापित करण्याइतपत मर्यादित असून उपरोक्त परिस्थितीत मंजूर दरापेक्षा बाजारात भाववाढ झाल्यास त्यासाठी लागू राहणार नाही. पुरवठादाराला बाजारात भाववाढ झाली तरीही मंजुर दराने पुरवठा करणे बंधनकारक आहे. पुरवठादाराने पुरवठा न केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल अगर मा.व्यवस्थापन समिती/मा.उपसमिती/मा.तदर्थ समिती/मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय जो निर्णय घेतील तो पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. याबाबत संबंधिताची कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

## O निविदा वैधता कालावधी-

१. सदर ई-निविदेचा वैधता कालावधी Technical Bid उघडल्यानंतर १२० दिवसांचा राहील.

## P. सर्व साधारण अटी शर्ती

१. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्पयावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

२. पुरवठादाराचे/ संस्थेचे आवश्यकता वाटल्यास Vendor Audit केले जाईल.

३. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता/कोपरगाव कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

४. राज्याबाहेरील निविदाकाराची निविदा मंजुर झाल्यास शासनाचे सुधारित खरेदी नियमावलीतील नियम क्र.३.१.२.८ नुसार राज्याबाहेरील पुरवठादार जर न्युनतम असला व महाराष्ट्र राज्यातील पुरवठादार व्दितीय न्युनतम असला तर महाराष्ट्र राज्यातील पुरवठादारांना प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्र राज्यातील व्दितीय न्युनतम दरधारक जर न्युनतम दरधारकांच्या दरात बिस्कीटे पुरविण्यास तयार असेल तर एकूण खरेदी करावयाच्या बिस्कीटांच्या ५० टक्के बिस्कीटांचा पुरवठा आदेश राज्यातील पुरवठादाराला देण्यात येईल व ते जर तयार नसतील तर पुर्ण मालाचा पुरवठा आदेश राज्याबाहेरील पुरवठादाराला देण्यात येईल.

५. पुरवठादाराने बिस्कीटांचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास तसेच संस्थानने नमूद केलेले कुठल्याही अटी-शर्तींचा भंग झाल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन सदर पुरवठाधारकाचे नांव पुढील ३ वर्षासाठी काळया यादीत समावेश केले जाईल. याबाबत मा.तदर्थ समिती/ मा.व्यवस्थापन समिती/मा.उपसमिती/मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जो निर्णय घेतील तो आपणावर बंधनकारक राहील. याबाबत आपली काहीही तक्रार चालणार नाही.

६. कोणतीही निविदा अंशतः/पुर्णतः स्विकारणे किंवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे

७. सशर्त निविदा तात्काळ रद्द करण्यात येतील. सदर निविदेतील नमूद अटी-शर्ती व अर्हता पूर्ण करू न शकलेल्या निविदाधारकांच्या निविदा रद्द करण्यात येतील.

८. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी संस्थानवर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

(दीपक मुगळीकर, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

# निविदाधारकाबाबत माहिती

१. फर्मचे नांव- ------------------------------------------------------------

२. पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता- ------------------------------------------------------------

३. दूरध्वनी क्रमांक- ------------------------------------------------------------

ऑफीस- ------------------------------------------------------------

दुकान- ------------------------------------------------------------

निवास- ------------------------------------------------------------

मोबाईल नंबर- ------------------------------------------------------------

फॅक्स नंबर- ------------------------------------------------------------

ई –मेल ------------------------------------------------------------

४. संपर्कासाठी व्यक्तीचे नांव- ------------------------------------------------------------

दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक- ------------------------------------------------------------

५. मालकाचे/भागीदारांची नावे १. ------------------------------------------------------------

२. ------------------------------------------------------------

६. बॅंक खाते नांव १.------------------------------------------------------------

शाखा २.------------------------------------------------------------

खाते नंबर व प्रकार ३.------------------------------------------------------------

आयएफएससी कोड ४.------------------------------------------------------------

दिनांक :- / /२०२०

ठिकाण :-

निविदाधारकाची सही व शिक्का



कै १११/२०२०

## अ) Technical Bid मधील कागदपत्रे (चेक लिस्ट)

१. अद्ययावत दुकान नोंदणी दाखला/ स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला उत्पादक संस्थेचा दाखला/तत्सम परवाना (उदा.ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगर पालिका)

२. GST नोंदणी दाखला/GST Online Registration Acknowledgement

३. पॅन कार्ड

४. २०१६-१७, २०१७-१८ व २०१८-१९ या ३ वर्षाचे सरासरी वार्षिक उलाढालीबाबतचे चार्टर्ड अकाऊंटन्ट यांचे प्रमाणपत्र

५. अदयावत अन्न आणि औषध प्रशासन नोंदणी परवाना (FSSAI परवाना)

**(ब) बिस्कीटांचे नमुने स्वतंत्र कापडी पिशवीमध्ये वरच्या बाजुस मालाचा प्रकार, फर्मचे नांव इ. तपशिलासह स्वाक्षरी करुन सिलबंद असलेले**

दिनांक - / /२०२०

ठिकाण -

**निविदाधारकाची सही व शिक्का**



9/12/2020

प्रति,
**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)
शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहमदनगर.

**विषय– सन २०२०-२१ करिता प्रसादालय व मंदिर विभागांसाठी बिस्कीटे पुरविण्याचे ई-निविदेबाबत...**

महोदय,

खालील सही करणार मी/आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिद्ध केलेली निविदा वाचली. आपल्या निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून मला /आम्हाला मान्य आहेत. आपले अटी/शर्तींचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी/आम्ही आपणांस निविदेमध्ये नमुद केलेल्या बिस्कीटांची, आपल्या मागणीप्रमाणे उपरोक्त कालावधीकरिता, संस्थानचे आवश्यकतेनुसार, आवश्यक त्यावेळी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांचे भांडार पोहोच करण्याची हमी देतो. सदर बिस्कीटांचे परिमाण अंदाजे असल्यामुळे वेळ प्रसंगी नमुद केलेल्या परिमाणापेक्षा २५% पर्यंत जास्त बिस्कीटांची संस्थानतर्फे मागणी झाल्यास मी/आम्ही तो मंजुर दराने पुरविण्याची हमी देत आहे/आहोत.

मान्य दराने बिस्कीटांचा पुरवठा करण्याची हमी म्हणून, मंजुर बिस्कीटांच्या एकुण रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून निविदा मंजुर झाल्याचे कळविल्यापासून १५ दिवसांचे आत मी/आम्ही रोख भरणा करु. याकरीता बयाणा रक्कम सुरक्षा अनामत खाती वर्ग करण्यास माझी संमती आहे. तसेच विहित केलेले स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करुन देऊ व त्याप्रमाणे मंजूर दराने निविदा कालावधीत नमुन्याप्रमाणे बिस्कीटे वेळेवर शिर्डी येथील मध्यवर्ती भांडार विभागात पोहोच करणे आमचेवर बंधनकारक राहील.

दिनांक - / /२०२०
ठिकाण -

आपला/आपले विश्वासू,

फर्मचे मालकाचे/भागीदाराचे नांव

सही/सहया व शिक्का

(१) ----------------------------------

(२) ----------------------------------

**सोबत-** कागदपत्रे



७/१२/२०२०

# वार्षीक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र

दाखला देण्यात येतो की, मे. ------------------------------------------------ यांचे

निविदेसंबंधित व्यवसायाची खालील नमूद आर्थिक वर्षाची उलाढाल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.नं | वर्ष | वार्षिक उलाढाल |
|---|---|---|
| १ | सन २०१६-१७ | |
| २ | सन २०१७-१८ | |
| ३ | सन २०१८-१९ | |
| | एकुण वार्षिक उलाढाल | |
| | सरासरी | |

लेखापरीक्षकाची सही/चार्टर्ड अकाऊंटंट
( नाव/ सही शिक्का)

नोंदणी क्रमांक.

दिनांक :-     /     /२०२०

ठिकाण :-

STATEMENT SHOWING THE PURCHASE OF BISCUITS FOR THE YEAR-2020-21

# BOQ

| Sr.No. | Description | Approximate Quantity | Unit | Rate Per Nos. | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| | **BISCUITS** | | | | |
| 1 | Biscuit - Glucose Small Packet (Patanjali/Parle/ Britaniya/Sunfeast) | 6,30,720 | Nos. | | |
| 2 | Biscuit - Glucose Big Packet (Patanjali/Parle/ Britaniya/Sunfeast) | 1,09,500 | Nos. | | |
| 3 | Biscuit -Namkeen Small Packet (Patanjali/Parle/ Britaniya/Sunfeast) | 3,06,600 | Nos. | | |
| 4 | Biscuit -Snacks Small Packet (Patanjali/Parle/ Britaniya/Sunfeast) | 3,67,920 | Nos. | | |
| 5 | Biscuit - Marie, Small Packet (Patanjali/Parle/ Britaniya/Sunfeast) | 2,62,800 | Nos. | | |

**(Deepak Muglikar, I.A.S.)**
**CHIEF EXECUTIVE OFFICER**
Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi

18/12 18/12/2020